I J R S S I S, Special Issue (V) Oct. 2025: 217-221
A Double-Blind Peer Reviewed Journal
OPEN ACCESS
e-ISSN 2347 – 517X
Original Article

Reg. No. : MH-NGP/0000167
INTERNATIONAL JOURNAL OF RESEARCHES IN SOCIAL SCIENCE AND INFORMATION STUDIES
© VMS RESEARCH FOUNDATION www.ijrssis.in

# मराठी दलित कादंबरी : पूर्वार्ध आणि उत्तरार्ध

**अनिल बोपचे**
डॉ. अरुण मोटघरे महाविद्यालय,कोंढा–कोसरा, ता. पवनी, जि. भंडारा
*Corresponding Author : dranilbopche2010 @ gmail.com

| Communicated : 06.09.2025 | Revision : 15.09.2025<br>Accepted : 25.09.2025 | Published: 15.10.2025 |
|---|---|---|

**सारांश :**
मराठी साहित्य विश्वात दलित साहित्याचा समृद्धरित्या उगम झाला. मराठी साहित्याच्या सर्व साहित्य प्रकारातून दलित साहित्यिक प्रकर्षाने लेखन करू लागले. त्यांच्या साहित्य लेखनामुळे मराठी साहित्याचे विश्व समृद्ध झाले. कविता, कथा,आत्मकथन या साहित्य प्रकारात दलित साहित्याने उत्तुंग भरारी मारली. तशी भरारी कादंबरी प्रकारात मारता आली नाही. दलित कादंबरी आपल्या पूर्वार्धात प्रकर्षाने साकार झाली. मात्र उत्तरार्धात ती काही क्षिण झाल्याचे दिसून येते. तरीही दलित कादंबरीचे महत्त्व नाकारता येत नाही. दलित कादंबरीतून सामाजिक चित्रणावर भर दिल्या जाते. तसेच या कादंबरीतून वास्तववादी चित्रण करण्यात येते. त्यामुळे दलित कादंबरी म्हणजे समकालीन वास्तवाला समर्थपणे उजागर करणारी कादंबरी होय असे म्हटले जाते. दलित कादंबरीचा मूळ गाभा म्हणजे दलित जीवनाची प्रकर्षाने मांडणी करणे हेच होय. दलित कादंबरी पूर्वार्धात ज्या पद्धतीने साकार झाली त्याच स्वरूपात उत्तरार्धात सुद्धा साकार झाली.

**प्रमुख शब्द–** दलित कादंबरी, कादंबरीचा उत्तरार्ध, मराठी साहित्य.

---

**प्रस्तावना :**

१९६० नंतर मराठी साहित्यात आमूलाग्र बदल घडून आले. या सर्व स्थित्यंतरांचे पडसाद मराठी कादंबरी विश्वात प्रामुख्याने उमटले. या निमित्ताने मराठी कादंबरीच्या प्रवाहात विविध वाङ्मयीन नवे प्रवाह उदयाला आले. यात दलित कादंबरी, ग्रामीण कादंबरी, प्रादेशिक कादंबरी, अस्तित्ववादी कादंबरी, स्त्रीवादी कादंबरी, वास्तववादी कादंबरी असे विविध कादंबरी प्रवाह जोरकसपणे अस्तित्वात आले. विशेषत: दलित कादंबरी ही या काळात आपले अस्तित्व अधिक सामर्थ्यानिशी सिद्ध करू पाहत होती. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रेरणेने दलित कादंबरीला नवी ऊर्जा मिळाली, नवे बळ मिळाले. त्यामुळे दलित कादंबरीने आपले वेगळे स्थान निर्माण केले. किंबहुना दलित कादंबरीने मराठी कादंबरीविश्वाला अपारंपारिक वास्तव जीवनानुभवाचे दर्शन घडविले. मुळात या कादंबरीची निर्मिती मानवी जीवनदर्शनाच्या दृष्टीतून झालेली आहे. दलित कादंबरीच्या पूर्वार्धातल्या व उत्तरार्धातल्या कादंबरीमध्ये कादंबऱ्यांतील चित्रणामध्ये दलित, वंचित समाजातील जीवनदर्शन अतिशय प्रत्ययकारीरित्या रेखाटले आहे. हेच या कादंबरीचे बलस्थान आहे.

**दलित कादंबरीचा पूर्वार्ध :**

दलित साहित्याच्या आरंभ साधारणत: १९६०पासून झाला व दलित साहित्याच्या प्रवाहाला १९६७ नंतर गती मिळाली. पुढील काळात कविता, कथा, नाटक, आत्मकथन, कादंबरी, समीक्षा, वैचारिक लेखन इत्यादी साहित्य प्रकारातून दलित साहित्य प्रसिद्ध होऊ लागले व या सर्वांमधून मराठी साहित्यात मोलाची भर पडली .

इतर दलित साहित्य प्रकारांप्रमाणे दलित कादंबरीला उत्तुंग भरारी मारता आली नाही. तरीसुद्धा दलित कादंबरीतील

सामाजिक वास्तव भूतकाळ व वर्तमान काळाच्या स्थितीगतीचा वेध घेणारा ठरतो. दलित कादंबरी बद्दल डॉ. मदन कुलकर्णी म्हणतात,''दलित कादंबरी ही १९६० नंतर मराठी साहित्यात लक्ष वेधून घेणाऱ्या दलित साहित्याच्या महावृक्षाची एक शाखा होय. एकूणच दलित साहित्याच्या तुलनेत दलित कादंबरीचा विकास फार मोठ्या प्रमाणावर झालेला आहे असे म्हणता येत नाही, तरीही या शाखेची उपेक्षा करावी एवढ्या कमी प्रमाणातही या कादंबऱ्यांची संख्या आहे असे मानण्याचे कारण नाही. दलित कादंबरी तशी सामाजिक कादंबरीच आहे. तसेच ती वास्तववादी कादंबरी आहे. एका अर्थाने दलित कादंबरी म्हणजे सामाजिक– वास्तववादी कादंबरीच होय.'' [१] या स्वरूपातून समाज वास्तवाचे यथार्थ दर्शन दलित कादंबरीतून केले जाते.

१९६० ते १९७५ या काळामध्ये अण्णाभाऊ साठे, शंकरराव खरात, ना.रा. शेंडे ,बाबुराव बागूल, केशव मेश्राम या लेखकांनी कादंबरी लेखन केले.

१९७५ नंतरच्या काळात शंकराव खरात यांची 'मी माझ्या गावाच्या शोधात' (१९८३) ही कादंबरी प्रसिद्ध झाली. या कादंबरीमध्ये महार जातीतील आनंद या इंजिनिअर तरुणाची कहाणी आहे. यात दलित – सवर्ण संघर्ष तसेच नायकाला स्वत:च्या समाजाशीच करावा लागणारा संघर्ष कादंबरीकारानी दाखविला आहे. 'सूड' (१९७०) ही मुरळीच्या मुलीचे जानकीचे भीषण जीवन चित्रण करणारी कादंबरी लिहून मराठी दलित कादंबरीचे दालन समृद्ध करणारे बाबुराव बागूल यांची 'अघोरी' (१९८३) व 'कोंडी' (२०००) या कादंबऱ्या प्रकाशित झाल्या. अघोरी या कादंबरीमध्ये बाबुराव बागुलांनी माणसाच्या मनातील क्रोध, द्वेष, वासना, आसक्ती, प्रेम, करुणा, शृंगार, सूड इत्यादी भाव कलात्मकपणे रेखाटले आहे. अघोरी ही अन्याय,अत्याचारविरुद्ध व शोषणाविरुद्ध दिलेल्या लढ्याचे चित्रण करणारी कादंबरी आहे. कोंडी ही अतिशय वेगळे अशा सूत्राची कादंबरी आहे. या कादंबरीत दलित चळवळीला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेले योगदान आणि आजच्या काळातील बाबासाहेबांच्या अनुयायांनी तिची केलेली वाईट अवस्था याची यथार्थ दर्शन घडते. 'पोखरण' (१९७२) ही कादंबरी लिहिणारे केशव मेश्राम यांची 'हकीकत आणि जटायू' (१९८०) ही कादंबरी प्रसिद्ध आहे. यामध्ये हकिकत व जटायू या दोन लघु कादंबऱ्या आहेत. या कादंबरीमध्ये केशव मेश्राम आपल्या गतायुष्यातील जीवनानुभव व्यक्त करतात. नामदेव ढसाळ यांनी 'हाडकी हाडवळा' (१९८१) ही कादंबरी लिहिली. या कादंबरीमध्ये बायजा या कर्तबगार दलित स्त्रीचे चित्रण आले आहे. भि. शी. शिंदे यांच्या 'अमृतनाक' व 'रायनाक' (१९८०)या दोन कादंबऱ्या प्रसिद्ध आहेत अमृतनाक व रायनाक हे नागवंशीय महार जातीचे पूर्वज होत. या कादंबऱ्यांतून भि. शी. शिंदे यांनी अस्पृश्यांचा गौरवशाली इतिहास वाचकांसमोर मांडला. तसेच सामाजिक विषमतेचे दर्शनही यातून घडवले. सुधाकर गायकवाड यांनी 'शूद्र' (१९८०) वैचारिक आणि भावनिक स्वरूपाची कादंबरी लिहिली. या कादंबरीत दलितांच्या हरपलेल्या स्वत्वाचा शोध घेण्याचा प्रयत्न त्यांनी केला. मुरलीधर जाधव यांची 'कार्यकर्ता' (१९८४) ही कादंबरी दलितांमधील ऐक्य टिकविण्याची धडपड करणाऱ्या आंबेडकरी प्रेरणाच्या एका कष्टाळू कार्यकर्त्याची कहाणी सांगते. 'मुक्काम पोस्ट देवाचे गोठणे' या आत्मकथनामुळे प्रसिद्ध झालेले माधव कोंडविलकर यांनी 'अजून उजाडायचा आहे' (१९८१) आणि 'छेद' (१९८२) या दोन महत्त्वपूर्ण दलित कादंबऱ्या लिहून दलित कादंबरीत भर घातली. अजून उजाडायचा आहे या कादंबरीत कोंडविलकरांनी चांभार या दलित जातीच्या जीवनाचे चित्रण केले आहे . येथे देवाजी चांभाराचे दारिद्रय ,

जातीयता व सामाजिक छळ याचे यथार्थ चित्रण कादंबरीकाराने केले आहे. छेद या कादंबरीमध्ये कोंडविलकरांनी दलितांमधील दलितच प्रतिष्ठेच्या उतरंडीत गुंतलेले असून परस्परांना उच्च नीच समजतात आणि एकोप्याने राहत नाही याबद्दलचे चित्रण केले. योगेंद्र मेश्राम यांची 'माझा गाव कुठाय?' (१९८८) ही एक महत्त्वाची दलित कादंबरी . सामाजिक विषमता आणि अन्याय हा या कादंबरीचा विषय आहे. या कादंबरीतील नायक चेतन कांबळी याची ही शोकात्म कथा आहे. अशोक व्हटकर यांची 'मेलेलं पाणी' (१९८२) ही ढोर जमातीचे चित्रण करणारी महत्त्वपूर्ण कादंबरी आहे. ढोर या जमातीचे पुढारपण करण्यासाठी सवर्णांमध्ये चाललेली स्पर्धा व त्यामध्ये ढोर जमातीचा होणारा छळ याचे अस्सल चित्रण या कादंबरीमध्ये व्हटकर यांनी केले आहे. दि.रा.वाघमारे यांची 'कल्लोळ' ही कादंबरी दलितांच्या मनात उठलेल्या भावनिक कल्लोळाची कहाणी सांगते. विजय काळे यांनी 'जागृती' (१९८५) ही विशू मेश्राम नावाच्या एमबीबीएस डॉक्टरची कथा सांगणारी कादंबरी लिहिली. येथे दलित सुवर्ण यांच्यातील आंतरजातीय विवाहाच्या मुद्द्यावर कादंबरीकाराने भर दिला आहे. माधव कसबे यांची 'नकुल' (१९८१)या कादंबरीमध्ये अनुरोध संततीच्या दु:खाचे अक्करमाशी या शरणकुमार लिंबाळे यांच्या आत्मकथनाप्रमाणे चित्रण आले आहे. या कादंबरीमध्ये नकुल या नायकाच्या संघर्षाची कथा कादंबरीकाराने रेखाटली आहे. यांच्याच 'युगविधान' (१९८३) व 'युगंधर ' (१९८८)या कादंबऱ्यांतून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे जीवनचरित्र सांगितलेले आहे. 'युगविधान' मध्ये डॉ. आंबेडकरांच्या जन्मपूर्व स्थितीचे व कोकणातील जीवनाचे चित्रण आले आहे. तसेच ही कादंबरी म्हणजे बाबासाहेबांच्या जीवन चरित्राच्या सामाजिक पार्श्वभूमीचे चित्रण करणारी कादंबरी ठरते. 'युगंधर' या कादंबरीमध्ये बा. स. हाटे यांनी १९२७ ते १९५६ या कालखंडातील बाबासाहेबांच्या गौरवशाली जीवनचरित्राचा आढावा घेतला आहे. बंधुमाधव यांनी 'रमाई' (१९८७) नावाची चरित्रात्मक कादंबरी लिहिली. या कादंबरीमध्ये त्यांनी रमाबाई आंबेडकरांच्या जीवन चरित्राचा आढावा घेतला आहे. रमाबाई आंबेडकरांच्या जीवनावर यशवंत मनोहरर यांनी सुद्धा बंधुमाधवप्रमाणेच 'रमाई' (१९९१) कादंबरी लिहिली. 'रमाई' ही सांस्कृतिक माता मानत यशवंत मनोहरांनी ही कादंबरी साकार केली. तसेच हिं.गो.बन्सोडे 'आभाळाएवढी' (१९८१), मुरलीधर भोसेकर 'सिद्धार्थची यशोधरा' (१९८७),, 'कपिल वस्तूचा राजकुमार' (१९८९), नाना ढाकूलकर 'भीमाई – रमाई(१९९१), यांच्या चरित्र कादंबरी लेखनातून डॉ. बाबासाहेब आंबेडकर , रमाबाई , बुद्ध, यशोधरा यांचे चित्रण येते.

दलित कादंबरीमध्ये स्त्रीलेखिकांचा अभाव दिसतो. या अनुषंगाने संजीवनी खारे सुगंधा शेंडे, प्रा. सुशीला जाधव मूल या बोटावर मोजण्याएवढ्याच लेखिका आढळतात. संजीवनी खारे यांची 'देवानाम प्रिय' (१९८४), प्रा.सुशीला जाधव–मूल यांची 'संबुद्ध' (१९८३), या कादंबऱ्या प्रसिद्ध आहेत. संबुद्ध या कादंबरीमध्ये सुशीला जाधव–मूल या लेखिकेने बुद्धाच्या जीवन चरित्राचा आढावा घेतला आहे. सुगंधा शेंडे यांची 'फिफुली' (१९८७), ही कादंबरी प्रसिद्ध आहे. या कादंबरीमध्ये अन्याय सहन करणाऱ्या दलित स्त्रीचे चित्रण येते. सायनचा परिसर हा या कादंबरीचा प्रमुख घटक असून या परिसरातील जनसामान्यांच्या सर्व बाजूचे चित्रण या कादंबरीत लेखिकेने केला आहे.

**दलित कादंबरीचा उत्तरार्ध :**

इ. स. २००० नंतरच्या कालखंडात शरणकुमार लिंबाळे, जी. के. ऐनापुरे, अशोक पवार हे लेखक प्रभावी पद्धतीने दलित कादंबरी साकार करतात. राकेश वानखेडे, शिल्पा

कांबळे या कादंबरीकारांनी अलीकडच्या काळात मौलिक स्वरूपाचे दलित कादंबरीलेखन केले.

माधव कोंडविलकर यांच्या ' हाताची घडी तोंडावर बोट' आणि 'आता उजाडेल' या दोन कादंबऱ्या २००१ मध्ये प्रकाशित झाल्या. याच वर्षी सुखदेव ढाणके यांची 'चेडा', बाबा भांड यांची ' तंट्या' , जी. के. ऐनापुरे यांची 'रिबोट' कादंबरी प्रकाशित झाली. २००३ या वर्षी शरणकुमार लिंबाळे यांची 'हिंदू' , माधव कोंडविलकर यांची 'एक होती कातळवाडी', २००४ मध्ये बाबाराव मुसळे यांची 'पखाल' , 'वारूळ', २००५ मध्ये योगेंद्र मेश्राम यांची 'लॉंगमार्च', २००७ मध्ये शरणकुमार लिंबाळे यांची 'बहुजन' , बी. रंगराव यांची 'तिमिरांगण', २००८ मध्ये योगेंद्र मेश्राम यांची 'गिधाडे' , अशोक पवार यांची 'इळनमाळ', बी. रंगराव यांची 'झुंड' व 'दंगल', २०१० मध्ये अशोक पवार यांची ' दर कोस दर मुक्काम' , २०१३ मध्ये अ. फ. भालेराव यांची 'धर्म ते धम्म', २०१६ मध्ये राकेश वानखेडे यांची 'पुरोगामी' , शिल्पा कांबळे यांची ' निळ्या डोळ्यांची मुलगी' ही कादंबरी प्रकाशित झाली.

**दलित कादंबरीचे स्वरूप :**

दलित कादंबरीचे स्वरूप व्यापक आहे. दलित कादंबरीने मराठी साहित्यविश्वाला वेगळी दिशा दिली. या कादंबरीचे अनुभवविश्व वेगळे होते. जे भोगलं, जे शोषलं, जे अन्याय सहन केलं त्या सर्व बाबी दलित कादंबरीत प्रकर्षाने आल्या. म्हणजेच या प्रकारातून दलित जीवनानुभवाचे प्रकटीकरण करण्यात आले. किंबहुना इतरांच्या जीवनानुभवाचे चित्रणही या कादंबरीत येते. ही कादंबरी दलित व इतर स्त्रियांचे चित्रणही तेवढ्यच ताकदीनिशी करते. मुळात या कादंबरीची निर्मिती मानवी वास्तव जीवनदर्शनाच्या समर्पक दृष्टिकोनातून झाली. त्यामुळे सामाजिकतेचे चित्रण करीत कादंबरी साकार करणे हा या कादंबरीचा प्रमुख उद्देश आहे. किंबहुना समकालीन वास्तव टिपणे हेही या कादंबरीचे महत्त्वाचे वैशिष्ट्य ठरते. या अनुषंगाने डॉ. शैलेंद्र लेंडे म्हणतात,'' दलित–आंबेडकरी कादंबरीने आपल्या अवतीभवतीच्या जीवनाचे वास्तववादी चित्रण प्रभावीपणे साकार केले आहे. महाराष्ट्रातील व भारतातील दलित समाज हा विविध दृ ष्टीतून शोषित – वंचित राहिलेला असा समाज आहे . या दलित समाजाचे विविधांगी स्वरूपाचे वास्तव साठोत्तरी काळातील दलित कादंबरीने ताकदीने मांडलेले आहे. त्या कादंबरी समाजवास्तवाला नवदोत्तरी दलित – आंबेडकरी कादंबरी आणखी ताकदीने विविधांगी तपशिलासह उजागर करण्याचा प्रयत्न करते.'' [२] दलित समाजातील उपेक्षित व दुर्लक्षित समूहांना ही कादंबरी महत्त्वाचे स्थान देते. किंबहुना त्यांच्या जीवनातील विविध स्तराचे वास्तव दर्शनही ही कादंबरी घडवते. डॉ. विलास काळे म्हणतात,'' दलितांच्या घरादाराचे व त्यांच्या वस्तीचे चित्रण दलित करीत असलेल्या उद्योग व्यवसायाचे व त्यांच्या राहणीमानाचे चित्रण, दलितांचे जीवघेणे दारिद्रय, दलितांच्या जीवनातील रूढी, प्रथा– परंपरा आणि अंधश्रद्धा, दलितांची दु:खे त्यांच्यावर सवर्णीयांकडून होणारा अन्याय, अत्याचार, प्रस्थापित व्यवस्थेविरुद्ध दलितांच्या मनात खदखदणारा विद्रोह,अस्पृश्य म्हणून दलितांना मिळणारी वागणूक व त्यांची होणारी अवहेलना, समाजातील जातिभेदाचा दलितांना होणारा त्रास, दलित जातीअंतर्गत असणारि श्रेष्ठ – कनिष्ठता, दलित कुटुंबजीवनाची सुंदर चित्रे, शिकलेल्या दलित तरुणाचे झपाट्याने होणारे पांढरपेशीकरण, त्यांचे स्वत:च्या कुटुंबापासून,समाजापासून तुटणे, फटकून राहणे, आंबेडकरांनी सुरू केलेला दलित मुक्ती लढा, दलित चळवळ व त्या चळवळीची आजची शोकांतिका, नेतृत्वाचे निर्माण झालेले प्रश्न, चळवळीत पडलेली फूट अशा विविध अंगाने दलित कादंबरीकाराने दलित जीवनाचा वेध

घेतलेला दिसून येतो.''[३] दलित कादंबरी विविधांगी विषयातून विस्तृत स्वरूपातून साकार झाली. दलित–सवर्ण यांच्यातील दरी दलित कादंबरीने अलगद उचलून धरली. परंतु अन्य ज्वलंत विषयांना या कादंबरीला भिडता आले नाही. या बाबतीत डॉ. रवींद्र ठाकूर म्हणतात, '' सवर्ण–दलित संघर्ष हा बहुसंख्य दलित कादंबऱ्यांचा विषय आहे. त्यात अस्वाभाविक असे काहीच नाही. तथापि धर्मांतरानंतर दलित समाजात जे मानसिक परिवर्तन झाले किंवा जे काही अंतर्विरोध निर्माण झाले त्यांचा मागोवा घेण्याचा प्रयत्न झालेला दिसत नाही.''[४] दलित कादंबरीत असे चित्रण आले असते तर ही कादंबरी अधिक सक्षम, अधिक प्रभावशाली ठरली असती. तरीसुद्धा मराठी कादंबरी विश्वात दलित कादंबरी कुठेही मागे पडलेली दिसत नाही.

**निष्कर्ष :**

दलित कादंबरीतून विविधांगी पातळ्यावरील, वेगवेगळ्या अनुभवातील दलित जीवन साकार झालेले दिसून येते. या कादंबरी साकार करण्यामागची प्रेरणा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची आहे. त्यांच्यामुळेच दलित समाज जागृत झाला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सांगितलेल्या क्रांतिकारक विचारांमुळे दलितांचे जीवन समूळ बदलून गेले. त्याचीच फलनिष्पत्ती म्हणजे दलित साहित्यिकांनी कादंबरीच्या क्षेत्रात मोठी क्रांती करत सक्षम स्वरूपाची कादंबरी साकार केली. त्यामुळे मराठी कादंबरीचे दालन समृद्ध झाले.

**संदर्भ सूची :**

डॉ.मदन कुलकर्णी, 'दलित जाणिवेची कादंबरी', अनंत प्रकाशन नागपूर, प्रथमावृत्ती १९९३, पृ.२.

डॉ.राजेंद्र सलालकर व डॉ.अनिल बोपचे, 'मराठी कादंबरी: परंपरा आणि चिकित्सा', विजय प्रकाशन नागपूर, प्रथमावृत्ती २०१९, पृ.१६६.

डॉ. विलास काळे, 'दलित कादंबरी: आशय आणि अविष्कार', सुगावा प्रकाशन पुणे, प्रथमावृत्ती २०११, पृ. ८४–८५.

डॉ. रवींद्र ठाकूर, 'मराठी कादंबरी: समाजशास्त्रीय समीक्षा', दिलीपराज प्रकाशन पुणे, द्वितीयावृत्ती २०१४, पृ. ३४३.